REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# सामाजिक समस्येत एड्स रोगाचे कारणे, परिणाम व उपाय:- एक समाजशास्त्रीय चिंतन

प्रा.डॉ.पडोळे डी.व्ही.
समाजशास्त्र विभाग प्रमुख , बी.एस.एस.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माकणी
ता.लोहारा. जि.उस्मानाबाद (महाराष्ट्र)

## ❖ प्रास्ताविक :-




हे एक अत्यंत भयकंर व गलिच्छ व्यसन आहे. विवाहीत परूष स्वतःच्या बायको अथवा अविवाहीत पुरूष लैगीक गरज म्हणून परस्त्रीशी रस घेत असतात आणि तिच्याकडे जाऊन व्याभीचार करतात. **एड्स (H.I.V)** अशी बिमारी आहे जी (व्हायरस) विषाणूमुळे होते. आणि हा व्हायरस मानवी शरीरासाठी अत्यंत घातक असतो. शरीरातील संरक्षण पेशी नाहीशा अथवा नष्ट करण्याची काय हे विषाणू करतात. त्याचा परिणाम म्हणून शरीरातील संपूर्ण स्वास्थ बिघडते, रोगप्रतिकारक क्षमता कमी होते. पण या रोगाचे सुरूवातीला कोणतेच लक्षण लक्षात येत नाहीत. हा विषाणू जिवाणू पेक्षाही लहान असतो तो मायक्रोस्कोप मध्ये ही दिसत नाही. आणि हा व्हायरस एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे लागत होत असते. आणि या रोगावर आजपर्यंत तरी एखादे इंजेक्शन, लस, डोस, टिका, निर्मित झाला नाही.

एड्सच्या प्रसारणांचे साधन म्हणजे वैश्याव्यवसाय समलिंगी संभोग (Homosexuals), रक्तदानाद्वारे, इंजेक्शनद्वारे, मादक पदार्थाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीद्वारे फैलाव होऊ शकतो. भारतदेशात जवळपास २० लाखापेक्षाही जास्त वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला आहेत. यामध्ये कॉलगर्लचा समावेश नाही. यामधील अधिक **एड्स (H.I.V)** एड्सग्रस्त दिसुन येतात. ज्या ज्या व्यक्तीशी संबंध येईल तेवढया लोकांना हा रोग होणाराच विद्यार्थी, श्रमिक, ट्रक व स्कुटर चालक, गलीच्छ वस्त्यातील लोक काही प्रमाणात ब्लड बँक, दाढी बणवनारे लोक, गर्भवती माता ती आपल्य मुलाच्या शरीरात रोगाचे संक्रमण करते हा व्हायरस एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संचार होत असतो. अशा प्रकारे एड्स हा रोग दिवसे दिवस वाढतंच आहे. हे आपणास दिसुन येते.

## *अभ्यासाचे महत्व :-

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या मुख्य उद्देश भारतीय समाज सामाजिक समस्येचा अभ्यास म्हणून एड्स या रोगा अभ्यास करावयाचा आहे. त्यामुळे एड्स या रोगाविषयी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, संस्कृतिक स्थीतीचा अभ्यास व भारतीय समाजातील विकासाला अडथळे कशा प्रकारे निर्माण करतात. याचा अभ्यास करावा लागतो. एड्सग्रस्त रोग्यांना शासनाकडून विविध प्रकारच्या सोयी सवलती उपलब्ध करन देणे व त्यांच्या पूर्ण सामाजिकरण करणे म्हत्वाचे आहे व समाजातील इतर लोकांना देखील जागृती निर्माण करून देणे.

## *अभ्यासाची उद्दिष्टये :-

१. एड्सग्रस्तांचा अभ्यास करणे
२. शासन ज्या इतर रोज्यांना सोयी सुविधा देते तशाच सुविधा देते तशाच सुविधा एड्सग्रस्तांना दयावा.
३. एड्सग्रस्तांचा सहभाग एड्समुक्तीसाठी करून घेता येतो.
४. एड्सग्रस्त रोग्यांनी इतरांना हा रोग होवू नये. याची काळाजी घ्यावी
५. शासनाच्या सोयी सवलतींचा लाभ घ्यावा.

## *गृहीतके :-

१. एड्स बाधीत लोकांचा अभ्यास करणे.
२. एड्स रोग समाजातील विकासाचा अडथळा करू नये. यांच्या साठी सोयीचा अभ्यास करणे.
३. एड्स रोगांचे लोकातील गैरसमज दूर करणे.
४. स्वंतत्र शासन यत्रणेची गरज पाहीजे.
५. शासनाचे धोरण कोणते याचा अभ्यास करणे.

## * संशोधन पध्दती :-

भारतीय समाजव्यवस्थेत एड्सग्रस्त रोग्यांचा अभ्यास विषय दृष्टीकोन तपासणे, सदरील शोध पत्रिका तयार करताना सामाजिक घटकातील प्रथम व दुय्यम स्त्रोतांचा अभ्यास

केलेला आहे. प्रथम स्तोत्रात सहकारी दवाखाने अथवा खाजगी दवाखानाचा अभ्यास केलेला आहे. त्याच बरोबर दुय्यम स्त्रोतात, साहीत्य, प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ शासकीय अहवाल, नियतकालीके, दैनिक पक्ष, दैनंदिनी इत्यादीचा समावेश केलेला आहे.

*** स्थान :-**

भारतीय समाजात एड्स दिवसे दिवस वाढतच चाललेला दिसतो. या मध्ये भारतातील जे काही मेट्रो शहरे आहेत. त्यात मुबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास, या शहरात एड्सचे प्रमाण जास्त असलेले दिसते. तसेच हाय प्रोफाईल, पांढरपेशी, कॉलगर्ल या मध्ये एडस्चे प्रमाण दिसुन येते तसेच ड्रायव्हर, कामगार, मजुर, यामध्ये एड्सग्रस्ततांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. पण अशांची माहीती लगेच मिळते कारण यांचा उपचार सरकारी अथवा निम सरकारी साध्या दवाखाण्यात केला जातो. पण हायप्रोफाईचे निदान गुपीत असाल्या कारणास्तव त्यांची माहीती मिळत नाही. पण अलीकडे सदरील रोगावर औषध उपलधब नाही पण उपचार रोगप्रतिकार शक्ती वाढवणे प्रतिबंधात्मक उपाय आपण करू शकतो अलिकडेच मराठवाडयात १९९३ साली लातूर व उस्मानाबाद येथे भुकंप झाले. त्यावेळी संपुर्ण घरांची पडझड झाली. त्यांच्या पूनर्वसनसाठी शासनाने विविध उपाय योजना नेमल्या आणि अशा अवस्थेत जे लोग बाहेर गावी कामाला होते ते गावाकडे आले आणि त्यांच्या रोगाची लागण इतरांना झाली. म्हणून भुकंप ग्रस्त भागात एड्सचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आणि हा रोग खेडयात माहीत सुद्धा नव्हता तो भुकंपामुळे माहीत झाला मग त्याचे किती भयानक स्वरूप असते. हे ग्रामीण भागातील लोकांना माहीत झाले. एड्सग्रस्त रोगी मरण पावल्यानंतर त्यांच्या परिवारातील सदस्यांशी कशी हेळसांड होते व समाज त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहत असतो त्यांना कोणोही जवळ घेत नाही. हे स्वरूप भयानक आहे. या सर्व बांबीचा अभ्यास एक समाजशास्त्रांचा विद्यार्थी म्हणून करणे गरजेचे आहे.

*** एडसची कारणे :-**

१. वेश्याव्यवसाय करणाऱ्याकडून हा रोग होतो.
२. समलिंगी संभोगाच्या द्वारे
३. इंजेक्शनच्या माध्यामातुन
४. केशकर्तनालयाच्या माध्यमातुन
५. रक्तदानाच्या माध्यमातुन
६. झोपडपट्टीतील लोकामधुन
७. वाहन चालक
८. कामगार
९. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून
१०. लोकातील अज्ञानपणा
११. लोकातील अंधश्रद्धा

भारतामध्ये १४९८ पासुन **वास्को -द- गामाचे जहाज कालीकत बंदरात** उतरले. तेव्हापासून त्या बोटीवरून येणाऱ्या सैनिकामुळे हा रोग बंदरात राहणाऱ्या कुटुंबियामध्ये (स्त्रीयामध्ये) पसरला. हा रोग सैनिक आणि लोकासमवेत सुरू
झाला आणि तेथुन तो देशभर पसरला म्हणुन त्याला **फिरग्याचा रोग (Firangi Rogan)** असे म्हणतात.

या **एड्स (H.I.V)** एड्स रोगाबद्दल अधिकृत माहीती मिळु शकत नाही. त्यांना समाजात लाजिरवाणी वाटते व समाजाला, कुंटुबाला, सतत भितत वावरत असतात. आणि तो रोग लपवून ठेवला जातो आणि त्याचा परिणाम म्हणून एखादया निष्पाय व्यक्तीला हा रोगा होवू शकतो.

*** एड्स रोगाचे परिणाम :-**

वरील कारणाशिवाय एड्स हा रोग सहजासहजी होत नाही. एड्स हो एक प्रकारचा रोग प्रतिकारक शक्ती कमी करण्याची परिणाम करणारी एक कमतरता आहे. एड्स झाल्यामुळे सदरील व्यक्तीला सतत थकवा अशक्तपणा आल्यासारखा वाटत असतो. त्यांच्या अंगात सतत ताप राहत असतो. व्यक्तीच्या शारीरीक विकासात येत असते त्यामुळे व्यक्तीचे आयुर्मान कमी होते. कधी कधी २-३ महीन्यात त्याचबरोबर कधी-कधी २-३ वर्षामध्ये शरीराने तंदुरूस्त असलेल्या व्यक्तीचा देखील मृत्यू होतो. ज्या देशातील व्यक्ती शिकुन शहाणे होण्यास तयार होत नसंतात शिकुन ही समाजाच्या हिताबद्‌ल जागरूक राहण्यास तयार नसतात. त्यावेळी अशा अडणीपणाकडे कातडे पाघारण्याच्या देशात जनता, सरकार, लोकप्रतिनिधी, सरकारी अधिकारी सर्वच एड्स सारख्या समाजाची शक्ती खर्ची करायला जबाबदार असतात.

*** एड्स रोगावर उपाय :-**

**एड्स (H.I.V)** हा रोग कोणत्या कारणामुळे होतो. यावर संशोधन चालु आहे. भारतातील विविध शास्त्रज्ञ,

LBP PUBLICATION

वैज्ञानिक, डॉक्टर्स लोक आहोरात्र प्रयत्न घेत तरी अद्यापही निश्चित उपाय सापडलेला नाही. असे असले तरी आपण करणे पाहीलीतर ती केवळ मनुष्याच्या बेजबाबदार वर्तुनातुन उद्भवलेली आहेत तरूण मानसाचे कौतुक करीत न बसण्यापेक्षा कडक कारवाई करणे हाच उपाय आहे.

१. विवाहपूर्वक आणि विवाह बाहय लैगिक संबंध टाळलेच पाहिजे.
२. लैंगिक संबंध ठेवताना निरोध व संततीनियमनांची साधने वापरली पाहीजे.
३. दसुऱ्याचे वापरलेल्या सुया, रेझर्स यांचा वापर अजिबात करता कामा नये.
४. एड्स झालेल्या पालकांनी मुलांना जन्म देवू नये. सरकार व विविध सस्थानी तसा प्रयत्न करावा.
५. नागरिकांनी आडानीपणा सोडावा माहीती करून द्यावी.
६. धर्मगुरू, साधु, बुवा महाराज, साधवी यांचे प्रस्थ वाढतच आहे. हजारो श्रोते सभांना हजर राहतात. त्यांना लैगिक संबंधातून स्वतःला संयमीत ठेवण्याचे धडे दयावेत.

लोकांना सुधारणे हाच उपाय एरवी पशुसारखे वर्तन ठेवायचे. असेल, तर त्यांना या व्यसनापासून मुक्तता नाही.

## * एड्स नियंत्रणविषयक प्रतिबंधात्मक उपाय :-

एड्स नियंत्रणात ठेवण्यसाठी अथवा ठेवण्याच्या दृष्टीकोनातुन आणखीण काही उपाययोजनांचा समावेश केला पाहीजे.

१. एड्स या समस्येवर अथवा समस्येच्या बाबतीत योग्य माहीती देण्यासाठी डॉक्टर आणि नर्स यांच्यासाठी एक वेगळे प्रशिक्षण, पाठयक्रम योजना आखल्या पाहीजे.
२. सुरक्षितरीत्या सेक्स, याविषयी लोकांमध्ये प्रसार व प्रचाराची अत्यंत आवश्सयकता आहे. यासाठी टि.व्ही रेडीओ, व वर्तमानपत्रे याद्वारे मोठा प्रसार करण्यात यावा.
३. शिक्षण संस्थाच्या अंतर्गत तशा पध्दतीच्या अभ्यास क्रमाचा समावेश करून योग्य ज्ञान शाळा महाविद्यालयापर्यंत पोहचविणे गरजेचे आहे.
४. एड्स प्रसार, प्रचार केंद्राची स्थापना करणे.
५. रक्तदान करणाऱ्या व्यक्तीची पुनः पुन्हा रक्त तपासणी करणे गरजेचे आहे.
६. सुरक्षित सेक्सचे शिक्षण देणे
७. सिरीजच्या प्रयोगावर भर दिला पाहीजे.
८. वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियासाठी विनामुल्य निरोध (कंडोम) पुरवठा केला पाहीजे.
९. एड्सचे परिक्षण मोफत व गुप्त करावे.
१०. विविध सार्वजनिक उत्सवात या रोगाविषयी लोकांना सावधानतेचा इशारा देणे.

## * निष्कर्ष :-

भारतीय अथवा कोणताही समाज हा परिवर्तनीय आहे. भारतीय समाज हा धर्म, जात, वर्ण, अश्रमव्यवस्था वर अधारीत आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीय लोकाची दिनचर्या असते आणि मानवाला प्रत्येक गरजा भागविण्यासाठी या समाव्यवस्थेत व्यवस्थेने व्यवस्था केलेली आहे. जसे विविध संस्था या प्रत्येक संस्थेचे कार्य ठरलेले असते धर्म, अर्थ, काम, मोक्ष याबाबी प्रत्यकाने केल्याचे पाहीजे. पण विशिष्ठ चौकटीत राहून म्हणून भारतीय संस्कृतित व्यक्तीला समाजबाहय वर्तन करण्याला परवानगी नव्हती. पण फ्रेंच राज्यक्रांती नंतर पूर्ण जगाची समाज व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने चालू लागली. त्यात भारतीय समाजही पाठीमागे नव्हता. पाश्चिमात्यकरणाचे वाटु लागले समाजात परिवर्तन हव आहे असे वाहु लागले आणि परिवर्तनाच्या नावाखाली चंगळवादी प्रवृत्ती जोर धरू लागली आणि येथे धर्माचे राजदंड निखळले आणि व्यक्ती हा दुराचारी, भ्रष्टाचारी, चोरी लुटमार करू लागला स्त्री ही केवळ भोगेची वस्तु आहे. असे मानु लागले आणि काही आंबट शौकीन लोकामुळे विवाह बाहय सबंध प्रस्थापित होवू लागले. अनेक स्त्रिया बरोबर संबंध निर्माण होवू लागले. आणि तेथुनच एड्ससारख्या त्या रोगांचे लागन झाली. पण शाननाने देखील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केला आर्जपर्यंत हा रोग थोडयाफार प्रमाणात नियंत्रित असल्याचा दिसुन येतो.

## * संदर्भग्रंथ :-

१. भारतातील सामाजिक समस्या- संगवे, डॉ विलास (संपादक)
२. भारतीय सामाजिक समस्या एं- मदन,जी. आर
३. सामाजिक समस्या एँ- अहुजाराय
४. आधुनिक भारतातील सामाजिक, समस्या- आगलावे प्रदि
५. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या - डॉ. सुधा काळदाते

६. आधुनिक भारतातील सामाजिक समस्या- डॉ. दिलीप खैरनार
७. social problems and sociological Thaery in Contemporary social problem - merto R.K
८. Crime correctionand justice- Tappan paul
९. The Crime problem (१९७०)- Reckless W.C
१०. Social problems (१९७८)- Dennis E. poplin

* **मासिक :-**

(१). पंचायत भारती- मुंबई
(२.) शैक्षणिक संदर्भ
(३.) पर्यावरण विशषांक- पूणे
(४) समाज प्रबोधन पत्रिका- पूणे



**प्रा.डॉ.पडोळे डी.व्ही.**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख , बी.एस.एस.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माकणी ता.लोहारा. जि.उस्मानाबाद (महाराष्ट्र)**

LBP PUBLICATION